निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : ८१ वा
सोमवार -२६ मे २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

लालू प्रसाद यादवांचा मोठा निर्णय

# पक्षातून आणि कुटुंबातून तेजप्रतापची हकालपट्टी

**आत्ताच एक्सप्रेस**

**बिहार/ वृत्तसेवा/** बिहारची विधानसभा निवडणूक तोंडावर आली असतानाच लालू प्रसाद यादव यांच्या कुटुंबातील कलह समोर आला आहे. आपल्या विवाहबाह्य रिलेशनशिपची जाहीर कबुली देणाऱ्या तेजप्रताप यादवची लालूंनी पक्षातून तसेच कुटुंबातून हकालपट्टी केली आहे. मोठ्या मुलाचे वर्तन हे बेजबाबदार आणि कौटुंबिक मूल्यांना धरुन नसल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

## विवाहबाह्य संबंधाची कबुली देणं महागात

लालू प्रसाद यादव यांचा मोठा मुलगा तेजप्रताप यादवने अनुष्का यादवसोबत असलेल्या १२ वर्षांच्या संबंधाची जाहीर कबुली दिली होती. काही वेळातच ती पोस्ट डिलिटही केली. पण त्याचे स्क्रीनशॉट सोशल मीडियावर चांगलेच व्हायरल झाले आहेत. त्यानंतर लालू प्रसाद यादव यांनी तेजप्रतापला कुटुंबातून आणि पक्षातून काढून टाकलं. एक्सवर पोस्ट करत लालू प्रसाद यादव यांनी यासंदर्भातील माहिती दिली. मुलगा तेजप्रताप यादवचं वर्तन बेजबाबदार असल्याचा ठपका ठेवत लालू प्रसाद यांनी त्याला सहा वर्षांसाठी बाहेरचा रस्ता दाखवला.

काय म्हणाले लालू प्रसाद यादव?

खाजगी जीवनात नैतिक मूल्यांकडे दुर्लक्ष केल्याने सामाजिक न्यायासाठीचा आपला सामूहिक संघर्ष कमकुवत होतो. मोठ्या मुलाचे कृत्य, सार्वजनिक वर्तन आणि बेजबाबदार वर्तन आपल्या कौटुंबिक मूल्ये आणि परंपरांनुसार नाही. म्हणून मी त्याला पक्ष आणि कुटुंबापासून दूर ठेवतो. आतापासून त्याची पक्षात आणि कुटुंबात कोणत्याही प्रकारची भूमिका राहणार नाही. त्याला पक्षातून ६ वर्षांसाठी काढून टाकण्यात आले आहे.

तो स्वतः त्याच्या वैयक्तिक जीवनातील चांगले-वाईट आणि गुण-दोष पाहण्यास सक्षम आहे. त्याच्याशी



ज्यांचे संबंध आहेत त्यांनी स्वतः च्या विवेकबुद्धीने निर्णय घ्यावेत. मी नेहमीच सार्वजनिक जीवनात सन्मानाने जगलो आहे. कुटुंबातील आज्ञाधारक सदस्यांनी सार्वजनिक जीवनात ही कल्पना स्वीकारली आहे आणि तिचे पालन केले आहे.

बिहार विधानसभेच्या निवडणुकीला अवघे सहा महिने बाकी आहेत. ही निवडणूक एनडीएसाठी, नितीशकुमारांसाठी आणि राजदच्या लालूप्रसाद यादव यांच्यासाठी अतिमहत्वाची आहे. अशा काळात राजदला एक मोठा हादरा बसला. लालूंच्या थोरल्या मुलाने, तेजप्रतापने आपल्या विवाहबाह्य संबंधांची थेट सोशल मीडियावर फोटो टाकत कबुली दिली. या प्रकरणावरुन एवढा गदारोळ झाला कारण तेजप्रताप यादवचे सात वर्षांपूर्वी ऐश्वर्यासोबत लग्न झालं आहे. त्याचे १२ वर्षांपासून अनुष्कासोबत संबंध होते तर ऐश्वर्यासोबत लग्न का केलं हा प्रश्न विचारला जात आहे.

बिहार भाजपनेही लालू प्रसाद यादवांच्या कुटुंबाच्या नैतिकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करायला सुरुवात केली होती. अखेर लालूंनी तेजप्रताप यादवची पक्षातून हकालपट्टी केलीच, सोबत कुटुंबातून बेदखलही केलं.

# यूक्रेनचा व्लादिमीर पुतिन यांच्या हेलिकॉप्टरवर ड्रोन हल्ला


**आत्ताच एक्सप्रेस**

**मॉस्को/ प्रतिनिधी/** रशियानं आज (२५ मे २०२५) यूक्रेननं आमच्या देशाचे राष्ट्रपती पुतिन यांच्या हेलिकॉप्टरवर ड्रोन हल्ला केल्याचा आरोप केला आहे. रशियाचा हा दावा आहे की या आठवड्यात कु स्‍र्क च्या दौऱ्यादरम्यान पुतिन यांचं हेलिकॉप्टर ड्रोन हल्ल्यामध्ये आलं होतं. मात्र, रशियाच्या एअर डिफेन्स सिस्टीमनं राष्ट्रपती पुतिन यांची सुरक्षा निश्चित केली. पुतिन यांच्या हेलिकॉप्टरवर हल्ल्याचे आदेश वोलोदिमीर झेलेंस्की यांनी दिल्याचा आरोप रशियानं केला आहे.

## झेलेंस्की यांचा आदेश होता, रशियाचा सर्वात मोठा दावा

रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन कधी शस्त्रसंधीसाठी तयार होतात, तर कधी यूक्रेनवर जोरदार ड्रोन हल्ला करतात. रशियन सैन्यानं शनिवारी रात्री यूक्रेनवर आतापर्यंतचा सर्वात मोठा ड्रोन आणि मिसाईल हल्ला केला दोन्ही देशांनी त्यांच्या ताब्यात असलेल्या एकमेकांच्या नागरिकांची सुटका केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी हा हल्ला करण्यात आला. हा हल्ला आश्चर्यजनक मानला जातोय कारण पुतिन यांनी यापूर्वी मानवतेचा दाखल देत २ वेळा शस्त्रसंधी केली आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि जगातील इतर देश रशिया आणि यूक्रेन यांच्यातील युद्ध थांबवण्याचा प्रयत्न करत आहेत. शनिवारी झालेले ड्रोन हल्ले रशियानं यूक्रेनची राजधानी कीवसह इतर मोठ्या शहरांमध्ये केले. यूक्रेनच्या जहाजाला रशियाच्या मिसाईलनं ओडेशा पोर्टवर बुडवलं. त्यामध्ये शस्त्र असल्याचा दावा रशियाचा आहे.

रशियानं यूक्रेनची राजधानी असलेल्या कीवसह इतर ठिकाणांवर मिसाईल आणि ड्रोन हल्लेकेले. रशिया आणि यूक्रेनमध्ये बंदिवान असलेल्या नागरिकांची अदलाबदली करण्यात आली आहे. यूक्रेनच्या अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार रशियाच्या हवाई हल्ल्यात १२ जणांचा मृत्यू झाला. यामध्ये लहान मुलांचा देखील



समावेश आहे. अनेक जण जखमी देखील झाले आहेत.पुतीन यांच्यावर शस्त्रसंधीसाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर दबाव वाढला आहे. या दरम्यान रशियानं यूक्रेनवर आतापर्यंतचा सर्वात मोठा आणि घातक हवाई हल्ला केला आहे. दरम्यान, रशिया आणि यूक्रेन युद्ध २४ फेब्रुवारी २०२४ पासून सुरु झालं होतं. ते युद्ध अद्याप थांबलेलं नाही. रशिया आणि यूक्रेन यांच्यातील युद्ध यूक्रेनच्या नाटोमधील सहभागाच्या मुद्द्यामुळं सुरु झालं होतं. रशिया आणि यूक्रेन यांच्यातील युद्ध थांबवण्यासाठी डोनाल्ड ट्रम्प सातत्यानं दबाव वाढवत आहेत. यूक्रेन जर नाटोत सहभागी झालं तर नाटोच्या सदस्य देशांना रशियाच्या सीमांपर्यंत पोहोचणं सोपं होईल. यालाच पुतिन यांचा विरोध आहे.

## नेता कितीही मर्द असला तरी सरपटणारा प्राणी होतो-संजय राऊत

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ वृत्तसेवा/**राज्यात महायुतीचं सरकार स्थापन झाल्यानंतर झालेल्या पहिल्याच मंत्रिमंडळ विस्तारात छगन भुजबळ यांना डावलण्यात आलं होतं. त्यांना मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्यामुळे भुजबळ यांची नाराजी उफाळून आली होती. मात्र, धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यानंतर भुजबळ यांना अखेर महायुती सरकारमध्ये मंत्रीपदाची संधी मिळाली. मुंडे यांच्या जागेवर अन्न व नागरी पुरवठा विभागाचा कार्यभार भुजबळ यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. यानंतर एबीपी माझाला दिलेल्या मुलाखतीत छगन भुजबळ यांनी मोठे गौप्यस्फोट केले. निवडणूक जिंकल्यानंतर पक्षानेच मला आमदारकीचा राजीनामा देण्यास सांगितलं होतं, असे त्यांनी म्हटले. तसेच धनंजय मुंडे यांना क्लीन चीट मिळाली तर राजीनामा देईन, असेही वक्तव्य भुजबळांनी केले. यावरून आता शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भुजबळ यांच्यावर निशाणा साधला आहे. संजय राऊत म्हणाले की, अजित पवार यांचा चोरलेला पक्ष आहे. त्याचे प्रमुख अमित शाह आहेत, ते दिल्लीत बसतात. एकनाथ शिंदे यांचा यांचा जो पक्ष आहे तो त्यांचा नाही तो अमित शाह यांचा पक्ष आहे. त्यामुळे भुजबळ यांनी सांगितले की, मला मंत्री करण्यामध्ये अमित शाह, नरेंद्र मोदी आणि फडणवीस यांचे योगदान आहे. त्यांनी अजित पवार यांचे नाव घेतले आहे का?

# अल्पवयीन तरुणीचे अपहरण करुन ६० दिवस लैंगिक अत्याचार

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ वृत्तसेवा/**डोंबिवलीत महाराष्ट्राला हादरवणारी घटना घडली आहे. अल्पवयीन तरुणीचे अपहरण करुन ६० दिवस लैंगिक अत्याचार करण्यात आला आहे. या तरुणीचा गर्भपात देखील करण्यात आला. या प्रकरण चौघांना अटक करण्यात आली आहे. मात्र, तरुणीचे अपहरण करणारा आरोपी फरार आहे. या घटेमुळे एकच खळबळ उडाली आहे.

## महाराष्ट्र हादरला! डोंबिवलीतील धक्कादायक घटना

या घटनेमुळे डोंबिवलीत संतापाची लाट उसळली आहे. मसाला विक्री करणाऱ्या एका इसमाने एका सोळा वर्षीय अल्पवयीन तरुणीचे अपहरण करून तिच्यावर अनेक वेळा लैंगिक अत्याचार केला. पीडित तरुणी गर्भवती राहिल्या नंतर एका महिलेच्या घरी नेऊन तिचा गर्भपात केला. त्यानंतर आरोपीने पीडित तरुणीला एका दाम्पत्याच्या घरी ठेवले. या दाम्पत्याने तिला वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडले. तिच्यावर पुन्हा लैंगिक अत्याचार सुरू होता.

सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीने हा सगळा धक्कादायक प्रकार उघडकीस आला.अखेर या टिळक नगर पोलिसांनी महिलेच्या घरी छापा टाकत मुलीची सुटका केली. पोलिसांनी एक महिलेसह तिचा पती ,दोन पुरुष अशा चार जणांना बेड्या ठोकल्यात. धक्कादायक म्हणजे यामधील अटक झालेली मुस्कान शेख या महिलेविरोधात याआधी देखील पीटा अंतर्गत गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे.पीडित तरुणी आपल्या आई आणि बहिणींसह डोंबिवली जवळील ग्रामीण परिसरात राहते. तिच्या आईचा खाद्यपदार्थ विक्रीचा व्यवसाय आहे. याच व्यवसायातून आशुतोष राजपूत या तरुणाचे त्यांच्या घरी येणे जाणे होते .तो देखील मसाले विक्रीचा व्यवसाय करत होता. याच ओळखीचा फायदा घेत आशुतोषने पीडित अल्पवयीन तरुणीशी ओळख वाढवली.

अल्पवयीन तरुणीने दहावीची परीक्षा दिल्यानंतर तिचे आणि तिच्या आईचे भांडण झाले. या दरम्यान तिचा आशुतोषशी संपर्क झाला. त्याने या तरुणीला त्याच्या घरी गेली. या संधीचा आशुतोषने फायदा घेतला. तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. मुलगी घरी परतली नाही म्हणून आईने शोधा शोध करण्याचा प्रयत्न केला. यादरम्यान आशुतोष हा तिच्या आईला भेटत होता. तुमच्या मुलीला आज या ठिकाणी बघितले त्या ठिकाणी बघितले असे सांगून मुलगी शहरातच आहे असे सांगत होता. मुलगी रागवलेली असल्याने ते परत येईल या आशेने पीडितेची आई आशुतोष वर विश्वास ठेवत होती. मात्र दोन महिन्यांपासून मुलगी घरीच न आल्याने तिला संशय आला. तिने याप्रकरणी टिळक नगर पोलीस ठाण्यात मुलीचे अपहरण झाल्याची नोंदवली. पोलिसांनी मुलीचा शोध सुरू केला. याचदरम्यान ही मुलगी डोंबिवली जवळील ग्रामीण भागात एका घरात असल्याची माहिती मिळाली पोलिसांनी. या ठिकाणी छापा टाकत या पीडित मुलीची सुटका केली. पीडित मुलीने केलेल्या खुलाशानंतर पोलिसांनी तपासाची चक्री फिरवली. मुस्कान शेख तिचा नवरा यांच्यासह दोन जणांना अटक केली.चौकशी दरम्यान धक्कादायक माहिती समोर आली.

आशुतोष राजपूत याने मुलीचं अपहरण करत तिला एका खोलीत डांबून ठेवले होते. तीच्यावर लैंगिक अत्याचार केला. पिडीता गर्भवती राहिली. तिला एका दुसऱ्या महिलेच्या घरी नेऊन गर्भपात केला. त्यानंतर पुन्हा काही जणांनी तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.

यानंतर त्या ठिकाणाहून या मुलीला मुस्कान शेख नावाच्या एका महिलेच्या घरी डांबून ठेवण्यात आले होते. तिथे या पीडितेला वेश्या व्यवसायात ढकलत तिच्यावर लैंगिक अत्याचार सुरूच असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी पोलिसांनी पुढील तपास सुरू केलाय तर या प्रकरणात आशुतोष राजपूत हा अद्याप फरार आहे पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

# निलेश चव्हाण विरोधात पुणे पोलिसांची लूकआऊट नोटीस जारी

**बाळ न्यायला गेलेल्या वैष्णवीच्या नातेवाईकांना धमकावल्याचा आरोप**

**आत्ताच एक्सप्रेस**

**पुणे /प्रतिनिधी/** शशांक हगवणेचा साथीदार आणि बाळ मागण्यासाठी आलेल्या वैष्णवीच्या नातेवाईकांना धमकावणाऱ्या निलेश चव्हाणविरोधात लूकआऊट नोटीस काढण्यात आली आहे. निलेश चव्हाण परदेशात पळून जाऊ नये म्हणून पोलिसांनी लूकआऊट नोटीस काढल्याची माहिती आहे. निलेशच्या घरातून लॅपटॉप देखील जप्त करण्यात आला आहे.

आपल्याच पत्नीचे आणि इतर महिलांचे अश्लील व्हिडीओ बनवल्याचा आरोप निलेश चव्हाणवर आहे. याशिवाय बंदुकीचा धाक दाखवून निलेश चव्हाणने वैष्णवीच्या कुटुंबीयांना धमकावलं होतं. आता निलेश चव्हाणला पुणे पोलीस कधी गजाआड करतात हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

पोलिसांच्या चुकीमुळेच निलेश चव्हाण फरार

पोलिसांच्या चुकीमुळेच निलेश चव्हाण फरार झाल्याचा आरोप कस्पटे कुटुंबीयांनी केला आहे. वैष्णवीचे काका मोहन कस्पटे म्हणाले की, पोलिसांना जेव्हा कल्पना दिली होती तेव्हाच जर पोलिसांनी निलेश चव्हाणला अटक केली असती तर तो आज पळाला नसता. निलेश चव्हाण कुठे गेला आहे त्याचा शोध पोलिसांनी लवकरात लवकर घ्यावा. पोलिसांनी तत्परता दाखवून तातडीने त्याला अटक केली पाहिजे.

हगवणेंच्या तीन गाड्या जप्त




वैष्णवीने आत्महत्या केल्यानंतर तिचा सासरा राजेंद्र आणि मोठा दीर सुशील फरार होते. सुरूवातीला एन्डेव्हर कारने प्रवास करणाऱ्या हगवणे बाप बेट्यानं प्रवासादरम्यान वाहनं बदलली. पोलिसांना सहज माग काढता येऊ नये म्हणून राजेंद्र आणि सुशील वाहनं बदलत होते अशी माहिती समोर आली आहे.

पोलिसांनी एन्डेव्हर, बलेनो आणि थार या तिन्ही गाड्या जप्त केल्यात. यातील एन्डेव्हर ही स्वतः हगवणेच्या मालकीची आहे. बलेनो ही मुळशी तालुक्यातील राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्याची आहे. तर थार ही हगवणेंच्या एका नातेवाईकाच्या मालकीची असल्याची माहिती आहे.

पोलिसांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात

वैष्णवी आत्महत्या प्रकरणात, पुणे पोलिसांचा तपास पहिल्या दिवसापासूनच संशयाच्या भोवऱ्यात राहिल्याचं दिसतंय. अशातच पुणे पोलिसांवर प्रश्न उपस्थित करणारी आणखी एक बाब समोर आली आहे. वैष्णवीच्या आत्महत्येनंतर फरार झालेला सासरा राजेंद्र हगवणेच्या शोधासाठी पुणे पोलीस १८ मे रोजी पवना परिसरातील बंडू फाटक यांच्या फार्महाऊसवर गेले होते. त्या दिवशी पोलिसांकडून कुणावरही कारवाई करण्यात आली नाही. त्यानंतर २३ मे रोजी हगवणे बाप-बेट्याला याच फार्महाऊसमधून अटक करण्यात आली. हगवणे पिता-पुत्र पोलिसांना चकवा देत होते की पुणे पोलिसांच्या चुकीच्या तपासामुळे त्यांना लपंडाव खेळण्यासाठी सूट मिळाली होती? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# पावसाची धडाक्यात एन्ट्री

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी /** मान्सूनची तळकोकणात धडाक्यात एन्ट्री झालीय. नियोजित वेळेच्या आठवडाभर आधीच मोसमी वारे तळकोकणात पोहोचले आहेत.केरळात आठवडाभर आधी डेरेदाखल झालेला मान्सून महाराष्ट्रातही तब्बल आठ दिवस आधीच दाखल झालाय. २४ मे रोजी म्हणजेच काल केरळात दाखल झालेल्या मोसमी वाऱ्याने अवघ्या एका दिवसात कर्नाटक, गोव्याचा प्रवास पूर्ण करत थेट महाराष्ट्रात धडाकेबाज प्रवेश केलाय.त्यामुळे मान्सूनला यंदा जरा घाईच असल्याचं दिसंतय. अंदमान-निकोबारपाठोपाठ केरळ आणि आता राज्यतही मान्सून नियोजित वेळेआधी दाखल झालाय.

पुढील २ दिवसांत मान्सून केरळमध्ये दाखल होण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तविला. शिवाय अरबी समुद्राच्या दक्षिण भागातील काही भाग, मालदीव, लक्षद्वीप, कर्नाटकातील काही भाग, तामिळनाडू तसेच दक्षिण आणि मध्य बंगालच्या उपसागरातील काही भागापर्यंत मान्सून पुढे सरकण्याची शक्यता आहे. त्यामुळे गेल्यावर्षी पेक्षा ४ ते ५ दिवस आधीच मान्सून केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. पुढील चार दिवसांत कोकण व गोव्यात मेघगर्जना, वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस पडणार असा अंदाज हवामान खात्यानं वर्तवलाय. नैऋत्य मान्सून २४ मे २०२५ रोजी केरळमध्ये दाखल झाला. सामान्यत: तो १ जून रोजी दाखल होतो. म्हणजेच नैऋत्य मान्सून केरळमध्ये सामान्य तारखेच्या ८ दिवस आधी दाखल झाल्याची माहिती हवामान विभागाने दिलीय.



कोल्हापूर जिल्ह्यात मान्सूनपूर्व पावसाने जोरदार बॅटिंग केलीय. पावसामुळे जिल्ह्यातील बहुतांश नदी-नाल्यांना पूर आला होता. कृष्णा नदीवरील राजराम बंधारा ओव्हरफ्लो झालाय.मान्सून दाखल होण्याआधीच राजाराम बंधारा तुडुंब झालाय.बंधारा भरल्याने कोल्हापूरकरांना मोठा दिलासा मिळालाय.

इतिहासात पहिल्यांदाच इतक्या लवकर मान्सून

आतापर्यंतच्या इतिहासात पहिल्यांदाच इतक्या लवकर मान्सून दाखल झाल्याचा विक्रम पाहायला मिळतोय. १९५६,१९६२ आणि १९७१ मध्ये २९ मे रोजी राज्यात मान्सून दाखल झाला होता. त्यामुळे २५ मे रोजी मान्सून दाखल होण्याची ही पहिलीच वेळ आहे. सर्वात आधी १९५६ साली २९ मे रोजी लवकर मान्सून दाखल झाला. यानंतर ३१ मे १९९० रोजी लवकर मान्सून दाखल झाला. २९ मे १९६२ ही लवकर मान्सून दाखल होण्याची तिसरी वेळ होती. २९ मे १९७१ रोजीदेखील लवकर मान्सू दाखल झाला होता. २००६ साली ३१ मे रोजी लवकर मान्सून दाखल झाला होता.

# अवकाळी पावसाने शेतकरी देशोधडीला

महाराष्ट्रात अवकाळी पावसानं धुमाकूळ घातला आहे. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं आहे. बीडमध्ये शेतकऱ्याचा कांदा पावसात भिजल्यामुळे शेतकरी संकटात सापडला आहे.

अचानक आलेल्या या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्याची काय अवस्था झाली आहे पाहुयात सविस्तर... 'मी आता पुरती थकलेय नाही झेपत हो आता. नक्की आम्ही शेतकऱ्यांनी करायचं काय? हा चिखल बघा. तुम्हाला सांगायला मला शब्दही सुचत नाहीय. नोकरी करणाऱ्याला महिन्याला सॅलरी मिळते. व्यवसाय करणाऱ्याला त्याचे दिवसाचे पैसे मिळतात. अचानक ते मिळणारच नाहीत असं झालं तर तुमची जी घालमेल होईल ना. तशीच कदाचित त्याहून जास्त घालमेल माझी झाली आहे. आम्ही बीडचे आष्टीच्या शिंदेवाडीतले तीन एकरात कांद्या लावला. चांगलं पीक यावं म्हणून पाच सहा महिने राब राब राबले. उन्हातान्हात शेतात कसले, पीक आलं, कांदा काढला, शेतात वाळवला आता बाजारात नेऊन विकायचा तेवढा शिल्लक होता. पण दृष्ट पावसानं घात केला. थोडा थोडका नाही हो ३०० गोणी कांदा अवकाळीनं नासवला. सांगा ना आमची काय चूक.'त्यानंतर याविषयी पुढे बोलताना त्या म्हणाल्या, 'मरेस्तोर कष्ट करणाऱ्या शेतकऱ्याची मेहनत अशीच मातीमोल होते. आम्ही करायचं तरी काय? शेवटी शेतकरी. उद्या नुकसान भरपाई मागितली तरी तुम्ही लोक कुजबुज करणार. आधीच काळजी घ्याची होती. कुठेतरी साठवायचा होता. अहो, शेतात न राबणाऱ्या लोकांना बोलणं सोपं आहे. शेत उघड्यावर आहे. कडाक्याच्या उन्हात अचानक अवकाळी पाऊस आला. जमेल तेवढा झाकला लगेच नेणार तरी कसं आणि साठवायचा तरी कुठे? शेतकरीच नाही तर त्याच्या कुटुंबाला हे भोग भोगावे लागतात. आता मायबाप सरकारलाच विनंती आहे, पंचनामे करा आणि नुकसान भरपाई द्या. माझी चिमुकली पण मदतीला आली आहे. जून तोंडावर आलाय शाळा सुरू होणार फी कशी भरायची असा प्रश्न पडलाय. तीही बिचारी आमच्या बरोबर शेतात कांदे उचलते.'दुसरी शेतकरी महिला तिची व्यथा सांगत म्हणाली, 'माझी पण तीच व्यथा हो. सोनाली ताईंचा कांदा होता माझी हळद होती इतकाच फरक. हिंगोलीत सेनगावाच्या नागा सिंदगीमध्ये माझ्या शेतात मी हळद लावली. अपेक्षेप्रमाणे उत्पादन आलं. हळद वाळत घातली पण नशीबच खराब. वादळी वाऱ्यासह पावसानं झोडलं. आता शेतात वाळलेल्या हळदीचा पिवळा चिखल झाला आहे. हातातलं पीक गेलं आहे. आर्थिक नुकसान झालं. तुम्हीच सांगा आता पुढची वाट काय. बी बियाणांचे भाव आणि खतांचे भाव वाढलेत. त्यासाठी साठवलेला पैसा खर्च केला. पिकं आलं की काढणीला मजुर लागतात, त्यांच्या मजुरीचा खर्चही केला. हळद वाळली की विकायची हा विचार सुरू असताना अवकाळीचा मारा झाला आणि पिकांचा चिखल.' करणाऱ्याला महिन्याला सॅलरी मिळते. व्यवसाय करणाऱ्याला त्याचे दिवसाचे पैसे मिळतात. अचानक ते मिळणारच नाहीत असं झालं तर तुमची जी घालमेल होईल ना. तशीच कदाचित त्याहून जास्त घालमेल माझी झाली आहे. आम्ही बीडचे आष्टीच्या शिंदेवाडीतले तीन एकरात कांद्या लावला. चांगलं पीक यावं म्हणून पाच सहा महिने राब राब राबले. उन्हातान्हात शेतात कसले, पीक आलं, कांदा काढला, शेतात वाळवला आता बाजारात नेऊन विकायचा तेवढा शिल्लक होता. पण दृष्ट पावसानं घात केला. थोडा थोडका नाही हो ३०० गोणी कांदा अवकाळीनं नासवला. सांगा ना आमची काय चूक.'

त्यानंतर याविषयी पुढे बोलताना त्या म्हणाल्या, 'मरेस्तोर कष्ट करणाऱ्या शेतकऱ्याची मेहनत अशीच मातीमोल होते. आम्ही करायचं तरी काय? शेवटी शेतकरी. उद्या नुकसान भरपाई मागितली तरी तुम्ही लोक कुजबुज करणार. आधीच काळजी घ्याची होती. कुठेतरी साठवायचा होता. अहो, शेतात न राबणाऱ्या लोकांना बोलणं सोपं आहे. शेत उघड्यावर आहे. कडाक्याच्या उन्हात अचानक अवकाळी पाऊस आला. जमेल तेवढा झाकला लगेच नेणार तरी कसं आणि साठवायचा तरी कुठे? शेतकरीच नाही तर त्याच्या कुटुंबाला हे भोग भोगावे लागतात. आता मायबाप सरकारलाच विनंती आहे, पंचनामे करा आणि नुकसान भरपाई द्या. माझी चिमुकली पण मदतीला आली आहे. जून तोंडावर आलाय शाळा सुरू होणार फी कशी भरायची असा प्रश्न पडलाय. तीही बिचारी आमच्या बरोबर शेतात कांदे उचलते.'दुसरी शेतकरी महिला तिची व्यथा सांगत म्हणाली, 'माझी पण तीच व्यथा हो. सोनाली ताईंचा कांदा होता माझी हळद होती इतकाच फरक. हिंगोलीत सेनगावाच्या नागा सिंदगीमध्ये माझ्या शेतात मी हळद लावली. अपेक्षेप्रमाणे उत्पादन आलं. हळद वाळत घातली पण नशीबच खराब. वादळी वाऱ्यासह पावसानं झोडलं. आता शेतात वाळलेल्या हळदीचा पिवळा चिखल झाला आहे. हातातलं पीक गेलं आहे. आर्थिक नुकसान झालं. तुम्हीच सांगा आता पुढची वाट काय. बी बियाणांचे भाव आणि खतांचे भाव वाढलेत. त्यासाठी साठवलेला पैसा खर्च केला. पिकं आलं की काढणीला मजुर लागतात, त्यांच्या मजुरीचा खर्चही केला. हळद वाळली की विकायची हा विचार सुरू असताना अवकाळीचा मारा झाला आणि पिकांचा चिखल.'

# झुडपी जंगलांच्या जमिनीवर राजकीय पुढाऱ्यांची संस्थाने

विदर्भातील सहा जिल्ह्यामध्ये असलेल्या झुडपी जंगलांना वनक्षेत्र समजण्यात यावे असा ऐतिहासिक निर्णय सर्वोच्च न्यायालयाने गुरूवार दिनांक २२ मे २०२५ ला दिला.या जंगलांचा उपयोग शासकीय उद्देश वगळता अन्य कामांसाठी करता येणार नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.पूर्व विदर्भातील नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, आणि गडचिरोली या जिल्ह्यामध्ये झुडपी जंगलांचे क्षेत्र आहे.परंतु न्यायालयाच्या निर्णयाने रखडलेली विकास कामे मार्गी लागण्याची शक्यता आहे. राज्यातील झुडपी जंगलच्या जमीनी जास्तीत जास्त राजकीय पुढाऱ्यांनी मोठ्या शिताफीने हस्तगत केलेल्या आहेत.आज आपण विदर्भात अनेक अभियांत्रिकी महाविद्यालय,शाळा-कॉलेजेस, आश्रम शाळा, धर्मदाय रूग्णालये, अन्य संस्थाने यांच्या नावाखाली राजकीय पुढाऱ्यांनी ९० वर्षासाठी १ रूपयांच्या लिजवर जमीनी घेतलेल्या आहेत आणि आज हेच राजकीय पुढारी या हस्तगत केलेल्या जमिनीला आपल्या मालकीची समजतात.आपण आज जे काही शाळा-महाविद्यालय पहातो ते संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांचे असुन अवाढव्य फी व डोनेशन घेऊन करोडोपती झाल्याचे दिसून येतात व ऐश आरामाची जिंदगी जगत आहेत.परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक निर्णयामुळे या राजकीय पुढाऱ्यांवर चांगलीच चपकार बसण्याचे संकेत दिसत आहे.त्यामुळे राजकीय पुढाऱ्यांचे धाबे दणाणल्याचे दिसून येते.कारण ज्या ठिकाणी निसर्ग बागडत होता त्यावर राजकीय पुढाऱ्यांनी वेगवेगळी संस्थाने उभारून आपला कब्जा केला आहे.

परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने निसर्गाला मोकळा स्वास घेण्याची संधी नक्कीचं मिळेल असे मला वाटते.झुडपी जंगलातील १९८० नंतरच्या सर्व बांधकामांना अतिक्रमण ठरवत सर्वोच्च न्यायालयाने दोन वर्षांत अतिक्रमण काढण्याचे निर्देश दिला आहे. झुडपी जंगलजमीन वनीकरणाव्यतिरिक्त इतर कामांसाठी वळवण्याबाबत केंद्र आणि महाराष्ट्र सरकार यांच्यात तीन महिन्यांच्या आत आपसात सल्लामसलत करण्याचा निर्देश न्यायालयाने दिला आहे.पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने कोणतेही अनधिकृत बांधकामे न्यायालय खपवून घेणार नाही ही बाब स्पष्ट झाली आहे.न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे उल्लंघन करून १२ डिसेंबर १९९६ नंतर झुडपी जंगलाच्या जमिनी वनबाह्य उपयोगासाठी वाटप करण्यात आल्या होत्या याची कारणे आता जमीन वाटप करणाऱ्यां अधिकाऱ्यांना याची यादी द्यावी लागेल.विदर्भात मोठ्या प्रमाणात झुडपी जंगलाची जमीन आहे. ही जमीन महसूल विभागाच्या ताब्यात आहे व तिचा अनेक दशकांपासून आवश्यकतेनुसार रहिवासी, कृषी, सरकारी कार्यालये, सार्वजनिक शाळा,प्रार्थमिक आरोग्य केंद्र इत्यादी उद्देशाकरीता उपयोग केला जात होता.दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १२ डिसेंबर १९९६ व दिनांक १३ नोव्हेंबर २००० रोजी आदेश जारी करून कोणत्याही वनजमिनींचा वनबाह्य उपयोग करण्यासाठी वनसंवर्धन कायद्यानुसार केंद्र सरकारची परवानगी घेणे बंधनकारक आहे असे सांगितले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे पूर्व विदर्भातील सहा जिल्ह्यातील ८६४०९ हेक्टर झुडपी जमिनींचा विकास करण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे.आज देशातच नाही तर संपूर्ण जगात निसर्ग नामशेष होत आहे यांमुळेच मोठ्या प्रमाणात हवामानात बदल होत असुन भुकंप, सुनामी,हिमकडा कोसळने, ज्वालामुखीचा उद्रेक,वनवे लागने, समुद्राची पातळी वाढने असे अनेक महाप्रलय येत आहे किंवा यापुढे यापेक्षा जास्त विक्राळ रूप धारण करू शकते.त्यामुळे जंगल जेवढे वाचविता येईल तेवढे वाचविले पाहिजे.सर्वोच न्यायालयाच्या निर्णयामुळे वनीकरण मोठ्या प्रमाणात होईल याचा फायदा मनुष्य व जंगलातील संपूर्ण पशुपक्ष्यांना सुध्दा होईल.जंगल वाचविण्याच्या दृष्टीने सर्वोच्च न्यायालयाने सरकारला निर्देश दिले की जमीन वन विभागाला हस्तांतरित करण्यासाठी ताबडतोब पावले उचलावीत. सार्वजनिक हिताचा विचार करून जर हे शक्य नसेल तर जागेचे शुल्क वसूल करावे आणि त्याचा वापर वनक्षेत्राचा विकास करण्यासाठी करावा.राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की आपण आजी-माजी लोकप्रतिनिधी आहात व राज्याच्या ९९ टक्के झुडपी जंगलांच्या जमिनी राजकीय पुढाऱ्यांनी ९० वर्षासाठी १ रूपयांच्या लिजवर घेतल्या आहेत.परंतु वाढते औद्योगिकीकरण व वाढते शहरीकरण यामुळे वनक्षेत्र दिवसेंदिवस ढासळत आहे व कमी-कमी होत आहे आणि वनक्षेत्र वाचवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने झुडपी जंगलांचा योग्य निर्णय घेतला आहे.त्यामुळे झुडपी जंगलांवर कब्जा करणाऱ्यांनी प्रामाणिकपणे सरकारला किंवा वनविभागाला जमीनी परत करावी आणि वनक्षेत्रे वाढविण्यासाठी व वाचवण्यासाठी मदत करावी. विदर्भात जर ८६४०९ हेक्टर क्षेत्रात वनक्षेत्र वाढले तर संपूर्ण विदर्भात हिरवागार गालिचा पसरलेला दिसेल आणि हा विदर्भासाठीच नाही तर देशासाठी एक मोलाचा संदेश समजल्या जाईल.सर्वोच्च न्यायालयाने झुडपी जंगलांच्या बाबतीत घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहेच याचे मी मनापासून स्वागत करतो.परंतु सर्वोच्च न्यायालयाने याही पुढे जाऊन देशातील आजी-माजी राजकीय पुढाऱ्यांजवळ असलेली शेकडो हेक्टर जमीन हस्तगत करून वनक्षेत्राला द्यायला पाहिजे.कारण राज्यासह देशातील राजकीय पुढाऱ्यांच्या एकुण जमीनींचा हिशोब केला तर लाखो हेक्टर जमीन यांच्या घशात आहे यावरही अंकुश लागायला हवे व सरकारने ह्या संपूर्ण जमीनी वनक्षेत्राला देवुन सर्वत्र हिरवागार गालिचा निर्माण केला पाहिजे यामुळे ऑक्सिजनची मात्रा वाढेल व सर्वत्र वातावरण प्रफुल्लित रहाण्यास मोठी मदत होईल.

**-लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार )**




# समाज भूषण सुदामराव पवार बाबा आणि भीमा कोरेगाव विजयस्तंभ संरक्षण व संवर्धन समिती

भीमा कोरेगाव येथे पेशवाई विरोधात महारांनी केलेला १ जानेवारी १८१८ चा संघर्ष आज ही प्रेरणादायी लक्षवेधी आहे.२०१८ ला त्याला दोनशे वर्ष झाल्यानंतर राज्यात व केंद्रात पेशवाईचे वारसदार सत्ताधारी झाल्यावर त्यांना हा इतिहास नष्ट करण्याची खुमखुमी भरून आली होती.त्यासाठी त्यांनी मराठा ओबीसी तरुणांना हातीशी धरून भ्याड हल्ले केले होते. भीमा कोरेगाव इतिहास केवळ महाराष्ट्रातील आंबेडकरी विचारांच्या माणसांना माहिती होता. पण २०१८ नंतर देशातील नव्हे तर जगातील एकूण मानव जातीला माहिती झाला.ऐतिहासिक भीमा कोरेगाव विजयस्तंभालगतच्या जागेवर रखवालदार माळवदकर कुटुंबीयांनी केलेल्या अतिक्रमाविरूध्द रामदास लोखंडे यांनी प्रथमच दैनिक सम्राट चा प्रतिनिधी म्हणून दिनांक २३ डिसेंबर २००९ रोजी सम्राटच्या पहिल्या पानांवर ठळक बातमी प्रसिद्ध करून आंबेडकरी समाजात व प्रशासनात आवाज उठवला होता.या लढ्यात आंबेडकरी चळवळीचे लढाऊ नेते सुदामराव पवार बाबा यांचे प्रमुख मार्गदर्शन व सहकार्य होते.तसेच भीमा कोरेगाव विजयस्तंभ संरक्षण व संवर्धन समितीचे ते सल्लागार व ज्येष्ठ विश्वस्त होते. भीमा कोरेगाव विजयस्तंभ संरक्षण व संवर्धन समितीचे ज्येष्ठ विश्वस्त आंबेडकरी चळवळीचे लढाऊ नेते सुदामराव पवार बाबा यांचे प्रमुख मार्गदर्शन व सहकार्यामुळे रामदास लोखंडे स्थानिक पदाधिकारी आणि दैनिक वृतरत्न सम्राट प्रतिनिधी यांच्यामुळे महाराष्ट्रातील खेड्या पड्यात ऐतिहासिक भीमा कोरेगाव विजयस्तंभा लगतच्या जागेवर रखवालदार माळवदकर कुटुंबीयांनी केलेल्या अतिक्रमाविरूध्द प्रचंड असंतोष उफाळून आला होता.बहुसंख्य संस्था संघटना आणि पक्ष कार्यकर्ते यांच्या कडे स्वताचा कोणताही कृती कार्यकर्म नसतो. राज्यात कुठे तरी अन्याय अत्याचार,पुतळा विटंबना झाली की स्थानिक तालुका जिल्ह्यातील कार्यकर्त्यांना निषेध ,निदर्शन मोर्चे आंदोलन करण्याचा कार्यकर्म मिळतो.मग ऐतिहासिक भीमा कोरेगाव विजयस्तंभालगतच्या जागेवर रखवालदार माळवदकर कुटुंबीयांनी केलेल्या अतिक्रमा विरोधात जन आंदोलन राज्य भरात पेट घेत होते. त्याच जमिनी बाबतचा कोर्ट कचेरीचा सनदशीर मार्गाचे संघर्ष आदरणीय दादाभाऊ अभंग आणि रामदास लोखंडे आज ही लढत आहेत.सुदामराव पवार आणि मराठवाड्यातील आंबेडकर चवळीचे जेष्ठ नेते एन डी बाबा सोनवणे ही जवळचे मित्र होते.बाबासाहेबांच्या हाताखाली चळवळीत दुसऱ्या फळीतील नेते दादासाहेब रूपवते,आर डी भंडारे,बी सी कांबळे,यांच्या सोबत ग्रामीण भागात पहिल्या फळीचे नेते म्हणून एन डी बाबा, सुदामराव पवार आणि अकोला,बुलढाणा वाशिम,विदर्भ प्रदेश आणि मराठवाड्यातील अनेक लढाऊ कार्यकर्त्याची नेत्याची ओळख मला एन डी बाबा सोनवणे यांच्या मुळे झाली होती.

-सागर रामभाऊ तायडे ,भांडुप,मुंबई.

# फिरायला अवश्य जा. पण.......

आपण फिरायला जातो. कारण आपल्याला फिरणे आवडते. निसर्ग पाहाणं आवडतं. किल्ले व प्रेक्षणीय स्थळं पाहाणं आवडतं. जंगल, वनसंपदा व प्राणी पाहाणं आवडतं. विचित्र वस्तू वस्तू, व्यक्ती पाहाणं आवडतं. धार्मिक स्थळं पाहाणं आवडतं. धरणं, जलाशयं, नदी नाले, समुद्र पाहाणं आवडतं. त्यात अंघोळ करणं आवडतं. त्यासाठीच आपण फिरायला जात असतो.फिरणे अतिशय सुंदर कृती. कुणी सहलीसाठी फिरायला जात असतात. तर कुणी घरी कंटाळवाणं वाटते म्हणून फिरायला जात असतात. कुणी कामानिमित्त फिरायला जात असतात. कुणी मनोरंजन म्हणून फिरायला जात असतात तर कुणी कोणत्या कारणानं. फक्त त्यांच्यासाठी फिरणं महत्वाचं असतं.फिरायला जाण्याचा बेत. तो बेत जर घरात माहिती पडला तर भरपूरच आनंद आणि उत्साह संचारतो आपल्या परिवारात. अगदी ताजेतवाने झाल्यासारखे वाटत असते. एवढं फिरण्याला महत्व आहे. फिरणे हे कुठे व्हायला हवे? असा प्रश्न कोणालाही पडू शकतो. फिरायचं असेल तर एखाद्या भकास टेकडीवर आपण जात नाही. ना मोकळ्या मैदानात आफण फिरायला जात. मग आपण फिरायला कुठे जातो? फिरायला जातो आपण एखाद्या तलावाच्या काठावर. एखाद्या शेतात. एखादी नदी पाहायला. जंगल पाहायला. मंदिरं पाहायला. त्यातल्यात्यात आपण फिरायला जातो किल्ले व वस्तुसंग्रहालय पाहायला आणि प्राणीसंग्रहालय पाहायला. आता फिरायला जातो कुत्रीम निर्माण झालेले रिसॉर्ट पाहायला. ज्यात मनोरंजनासोबतच जेवनही असतं.

अलिकडे अशी बरीच ठिकाणे निर्माण झाली आहेत की त्या ठिकाणी मनोरंजनच मनोरंजन असते. अशा ठिकाणी बैलगाडीतून फिरायला मिळते. जे शहरातील मुलांनी पाहिलेलं नसतं व बैलगाडीतून बसून प्रवास करणे त्यांना अतिशय मनोरंजनाचं वाटतं. कधी उंट वा हत्तीवर बसून स्वारी करायला मिळत असते तर कधी घोड्यावरील स्वारी करायला मिळते. या रिसॉर्टमध्ये जादूचे खेळ असतात. काचेवर उभ्या राहणाऱ्या व माठ घेवून नृत्य करणाऱ्या स्रिया असतात. याच स्रिया थयथय काचाच्या तुकड्यावरही नाचत असतात. तशीच रिसॉर्टमध्ये दोरीवर खेळणारी व कलाकृती दाखविणारी मुलं असतात. त्या मुली सर्कशीत जसं दाखवलं जातं. तशाच करतबी या दोरीवरही दाखवतात. त्यातल्यात्यात आपल्याला पाहायला मिळणाऱ्या कळसुत्री बाहुल्या. त्याही आपल्याला रिसॉर्टमध्ये पाहावयास मिळतात. अलिकडील काळात फिरायला रिसॉर्टमध्ये गेल्यावर रिसॉर्टमध्ये त्याःची फ्वतःची बससुविधा असते. ते जंगल फिरायला नेत असतात. त्यातच त्या बसमधून फिरायला गेल्यानंतर आपल्याला वन्यप्राण्यांचेही दर्शन होत असते. तसंच अलिकडील रिसॉर्टमध्ये पोहोण्याच्याही सुविधा आहेत. त्यातच नावेतूनही फिरवत असतात. हे सगळं फिरुन झालं की मग जेवन तेही स्वादिष्ट व रंगारंगाचं मिळत असते. रिसॉर्टचं शुल्क भरपूरच असते की जे शुल्क सामान्य लोकांना परवडत नाही. परंतु असं शुल्क जरी परवडत नसलं तरी ते शुल्क तिथं जे काही पाहायला मिळतं, जे काही खायला मिळतं. अन् जे काही तिथं मनोरंजन होतं. त्यापेक्षा जास्त मोठं नसतं. फिरण्यातून हवामान बदल होतो. नवा उत्साह मनात निर्माण होतो. कार्य करण्याचा जोम निर्माण होतो. एवढंच नाही तर फिरण्यातून मन प्रफुल्लित होत असतं. तशीच वर्षभर मनावर आलेली मरगळ फिरण्यातून दूर होत असते. परंतु हे जरी खरं असलं तरी कधी कधी फिरण्याला गालबोट लागत असतं. जेव्हा अपघात होत असतो. असे बरेचसे अपघात झालेले आहेत. जसे दोन वर्षापुर्वी नागपूरात झालेला अपघात. एक विद्यार्थ्यांची बस सहलीनिमित्य विद्यार्थ्यांना फिरायला नेत होती. दुसरी घटना अशीच घडली होती. पंढरपूर यात्रेनिमीत्य भाविकांना फिरायला नेणाऱ्या एका बसचा पंढरपूरवरुन परत येत असतांना अपघात झाला होता. असे कितीतरी अपघात आहेत की जे लोकांच्या फिरायला जाण्यावर बंदी आणतात. परंतु तरीही फिरायला जाणं आवडतं. कधी कोणी फिरायला गेल्यानंतर जलाशयात पोहतांना डुंबून मरण पावतं तर कधी वन्यप्राण्यांच्या कचाट्यात सापडून मरण पावतं. कधी धार्मिक स्थळावर आतंकवादी हल्ले झाल्यानं मरण पावतं तर कधी धार्मिक स्थळावर पुरसदृश्य स्थिती निर्माण झाल्यावर मरण पावतं. नुकतीच घडलेली पहलगामची घटना. याही घटनेत भावीक फिरायलाच गेले होते. ज्यातून कुंकू पुसलं गेलं. ज्यासाठी ऑपरेशन सिंदूर करावं लागलं.

फिरणे.....फिरणे ही जरी कृती चांगली वाटत असली तरी त्या फिरण्यातून आपल्यावर संकटं येत असतात. अशी संकटं येत असतात की त्यातून आपण सावरु शकत नाही. कधी आपलेच प्रियजण मरण पावत असतात तर कधी आपला आधार जगातून निघून जात असतो. तरीही लोकं कालापकाल ते सर्व विसरुन पुन्हा नव्यानं फिरायला जात असतात.महत्वाचं सांगायचं झाल्यास फिरणे ही एक चांगली बाब आहे व फिरायलाच जायलाच हवं. कारण त्यातून आपल्या मनात नवा जोश व उत्साह निर्माण होत असतो. हे जरी खरं असलं तरी फिरण्यातून जे संकट निर्माण होत असतं. त्यामुळं अख्खा परीवार नेस्तनाबूत होत असतो. परीवारातील आनंदही नेस्तनाबूत होत असतो. म्हणूनच फिरायला अवश्य जावं. परंतु स्वतःच स्वतःची काळजी घ्यावी. जेणेकरुन आपल्यावर दुर्भाग्य कोसळणार नाही. आपत्तीही कोसळणार नाही आणि कोसळलीच तर त्यातून सावरण्याची ताकद स्वतःच स्वतःमध्ये निर्माण करावी. ज्यातून तुम्ही स्वतःला सावरु शकाल व त्यानंतर नवीन दिशा ठरवू शकाल एवढंच सांगणं आहे.

**- अंकुश शिंगाडे नागपूर**

## संक्षिप्त

### शेती आम्हालाच विक म्हणत अंगावर पेट्रोल ओतल्या प्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद /प्रतिनिधी/** खुलताबाद-तालुक्यातील लामणगांव येथील शेती आम्हालाच विक असे म्हणत अंगावर पेट्रोल ओतून जाळण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून,सदरील घटना रविवारी (दि.२०) घडली.या बाबत खुलताबाद पोलीस ठाण्यात दिलेला सविस्तर तपशील असा, खुलताबाद तालुक्यातील लामणगांव येथे ज्ञानेश्वर मालोदे यांची शेती असून,तू भाग्या कडुन पैसे का घेतले असे म्हणत,तु तुझी शेती आम्हाला विक म्हणुन मारहाण केली,यावेळी तेजस याने खिशातील पेट्रोलची बाटली काढून माझ्या अंगावर ओतली तर त्याचे वडिलांनी पेटवून दिले,यात आपण गंभीर जखमी झालो.

या प्रकरणी खुलताबाद पोलीस ठाण्यात ज्ञानेश्वर मालोदे यांनी दिलेल्या फिर्यादी वरून शिवाजी दिगंबर मालोदे व तेजस शिवाजी मालोदे दोघेही रा.लामणगांव तालुका.खुलताबाद यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मण भोजणे हे करीत आहेत.

### डॉ. संभाजी खराट यांच्या पुस्तकाचे मंगळवारी प्रकाशन

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी/** दिवंगत डॉ. संभाजी खराट लिखीत वैधव्याची समस्या आणि मुक्तीची दिशा या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा मंगळवारी २७ मे रोजी सायंकाळी साडेपाच वाजता आयोजित करण्यात आला आहे. एमजीएम विद्यापीठातील आर्यभट्ट हॉलमध्ये हा सोहळा होत असून या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.




सत्यशोधक डॉ. संभाजी खराट मित्रमंडळ, ग्रंथाली प्रकाशन आणि सर्व परिवर्तनवादी संघटना यांच्या वतीने हा पुस्तक प्रकाश सोहळा आयोजित केला आहे. यावेळी ज्येष्ठ विचारवंत व एमजीएम विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. सुधीर गव्हाणे, ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ. प्रल्हाद लुलेकर आणि एमजीएम विद्यापीठाच्या स्त्री व लिंगभाव अभ्यास आंतरविद्या अभ्यास शाखा विभागातील प्रा.डॉ. मंजुश्री लांडगे या पुस्तकावर भाष्य आणि मांडणी करणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सत्यशोधक विचारवंत प्रा. सुदाम चिंचाणे यांची उपस्थिती राहणार आहे. प्रकाशन सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन वर्षा संभाजी खराट, कॉ. एस.बी. टाकळखेडे, प्रा. प्रभाकर गायकवाड यांनी केले आहे.

### अमावस्या निमीत्त जटवाडा येथे होनार पंचामृत अभिषेक व महाप्रसाद

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती सभाजीनगर/प्रतिनिधी/** श्री.१००८ संकटहर पाश्र्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र जैनगिरी जटवाडा येथे दिनांक २७ मे मगळवार २०२५ रोजी अमावस्या निमीत्त सकाळी १० वाजता मुलनायक श्री.संकटहर पाश्र्वनाथ भगवंताचा पंचामृत अभिषेक णमोकार भक्ती मंडळचा सानिध्यात करण्यात येणार आहे. यावेळी सर्व उपस्थित समाज बांधवांना सकाळी ११ते २ या वेळेस अभिनंदन बाबूराव साखरे रेखा अभिनंदन साखरे बाहुबली नम्रता साखरे प्रिया खडके प्रिती वैभव गुलाखे सम्यक संस्कृती श्रियम साखरे जैन परीवार रामनगर छत्रपती सभाजीनगर यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात येणार आहे.अमावस्या निमीत्त सकाळी १० वाजता मुलनायक भगवंताचा पंचामृत अभिषेक नित्यनियम पुजा आरती करण्यात येणार आहे तरी समाज बांधवांनी मोठया संख्येने उपस्थित राहुन अभिषेक व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन महाप्रसादी दाता परिवार व जटवाडा क्षेत्राचे विश्श्वस्थ मंडळ यांनी केले आहे.



श्री.क्षेत्र जैनगिरी येथे महिन्याच्या प्रत्येक अमावस्येला भगवंताचा पंचामृत अभिषेक करण्यात येत असतो तसेच यावेळी महाप्रसादा-चेही आयोजन केले जाते.

## एमआयडीसी पोलिसांची मुसळधार पावसात दोन वाळू वाहनांवर जोरदार कारवाई

**आत्ताच एक्सप्रेस**

**पिंपळवाडी/प्रतिनीधी/हारून शेख/** पैठण एमआयडीसीचे पोलिस शुक्रवार रोजी मध्यरात्रीस गस्त घालत असतांना त्याच वेळी गोदावरीच्या पात्रातुन अवैध्यरीत्या वाळू उपसा करून छत्रपती संभाजी नगर व ईतर ठिकाणी विक्री करण्याच्या उद्देशाने घेवून जाणाऱ्या दोन हायवा वाहनांवर कारवाई केली.या दोन हायवा वाहनासह त्यात अस-लेली वाळू असा वीस लाख तीस हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.या विषयी पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार पैठण एमआयडीसी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस उप निरीक्षक संभाजी झिंजुर्डे व ईतर कर्मचारी रात्री साधारण एक ते दीड वाजेच्या सुमारास मुसळधार पावसामधे गस्त घालत असतांना त्यांना एका गुप्त खबऱ्या मार्फत माहिती मिळाली की, छत्रपती संभाजी नगर येथील एका वाळू तस्कराने गोदा पात्रात वाळू उत्खनन करुन करण्यास बंदी असतांनासुद्धा महसूल विभागास न जुमानता अवैध्य रित्या उत्खनन करून ती वाळू दोन महाकाय हायवा वाहनात भरून भरधाव वेगाने छत्रपती संभाजी नगरकडे अवैध्यरीत्या विक्री करण्यासाठी घेऊन जात आहे. असे सांगितले. तेंव्हा कर्तव्यावर असलेल्या पोलिसांनी पडणाऱ्या मुसळधार पावसात पैठण ते छत्रपती संभाजी




नगर रोडवरील पिंपळवाडी ( पि ) परिसरात भारत बेंच कंपनीचे वाहन नंबर एम एच ४३ बी एक्स ३४७३ व दुसरे टाटा कंपनीचे नंबर नसलेले वाहन अशा दोन वाहनांना अडवले असता त्यां दोन्ही वाहनात अवैध्य वाळू असल्याचे आढळले.तेंव्हा पोलिसांनी या वाहनाच्या चालकास या बाबत माहिती विचारली असता कोणतेही उत्तर न दिल्याने पोलिसांनी या दोन्ही वाहणाना पोलिस ठाण्यात आणून लावत दोन हायवा व त्यात असलेली वाळू असा वीस लाख तीस हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. सदरील कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक ईश्वर जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक संभाजी झिंजुर्डे यांच्यासह पोलीस हवालदार दिनेश दाभाडे,रामेश्वर पंडित यांनी केली.

## जालना जिल्हा निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/** ०९ वर्षाखालील मुला - मुलींची राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी जिल्हा बुद्धिबळ संघातर्फे जालना जिल्हा निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

जालना जिल्हा बुद्धिबळ संघाच्या वतीने सोलापूर येथे दिनांक २६ ते २७ मे २०२५ दरम्यान होणाऱ्या ०९ वर्षाखालील (दि. ०१/०१/२०१६ किंवा त्यानंतर जन्म असलेल्या) मुला-मुलींची राज्य अजिंक्यपद बुद्धिबळ स्पर्धेकरीता जालना जिल्ह्याचा संघ निवडीसाठी जिल्हा बुद्धिबळ संघ जालना च्या वतीने निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन रविवार दिनांक २५ मे २०२५ रोजी सकाळी ठीक १०:०० वाजता भारत शारीरिक शिक्षण महाविद्यालय, भक्त नगर,रेवगाव रोड, जालना येथे करण्यात आले आहे.

या स्पर्धेमधून गुणानुक्रमे मुलांचा गट मधून पहिले २ तसेच मुलींच्या गटातून पहिल्या २ खेळाडूंची निवड करण्यात येईल.

या स्पर्धेत विजयी खेळाडू हे पुढील राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये जालना जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील.

स्पर्धेसाठी येताना खेळाडूंनी स्वतःचा बुद्धिबळपट व नगर परिषदेचा जन्माचा दाखला सोबत आणावा.

या निवड चाचणी स्पर्धेत जास्तीत जास्त बुद्धिबळपटूंनी सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हा बुद्धिबळ संघाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. दयानंद भक्त, सचिव प्रा डॉ रत्नाकर कुलकर्णी, सह. सचिव श्री सतीश ठाकूर, पंच श्री कृष्णा ठाकूर, प्रा डॉ शाम काबुलीवाले, प्रा गजानन जगताप यांनी केले.

## बिल्डा ते जातेगाव फाट्या पर्यंतचे रस्त्यांचे काम बंद

**सर्वसामान्य वाहनधारकांना मनस्ताप,**

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री/प्रतिनिधी/सरफराज पटेल/** फुलंब्री तालुक्यातील बिल्डा ते जातेगाव रस्त्यांचे काम चालू होते, ते गेल्या तीन ते चार महीन्यापासुन बंद असल्याचे समोर येत आहे.

परंतु या बंद रस्त्यांमुळे सर्व सामान्य वाहनधारकांना त्रास सहन करावा लागत आहे.बिल्डा ते जातेगाव फाटा डांबरी करण रस्त्याचे काम गेल्या ३ महिन्यापासुन बंद असुन बिल्डा ते चिंचोली बु पर्यंत अर्धवट काम केले असुन त्यामुळे जाणा-या येणा-याची गैर होत आहे. धामणगाव व बिल्डा ते जातेगाव फाटा हया रस्त्याचे डांबरी करणाचे काम मंजुर असतांना ते फक्त बिल्डा ते चिंचोली बु पर्यंत झाले असुन त्यामुळे ते चार गावांचा संपर्क असलेला रस्त्यामुळे सर्वांना त्रास होत आहे .

३ महिन्या पासुन काम बंद आहे व आता पावसाळाला सुरुवात झाली असुन अजुन जास्त त्रास होणार आहे तरी संबंधित अधिकारी यांनी तात्काळ लक्ष देऊन काम पुर्ण होईल व जनतेचा प्रश्न मार्गी लागेल नसता काम लवकरात लवकर सुरु करावे .नसता लोकशाही मार्गाने उपोषण करण्यात येईल. असा इशारा बबन डिडोरे पाटील यांनी सांगितले. या समस्या संदर्भात संबंधित विभागाच्या अधिकार्यांना काल दिनांक २१ मे बुधवार रोजी निवेदन देण्यात आले आहे.

## लासुर स्टेशन येथे भारत शौर तिरंगा यात्रा मोठ्या उत्साहात साजरी

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/ प्रतिनिधी/**गंगापूर तालुक्यातील लासुर स्टेशन येथे राष्ट्रप्रेमाची प्रचिती देणारी भारत शौर तिरंगा यात्रा ला-सूर नगरीत मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली...हमसे जो टकरायेगा मिट्टी मे मिल जायेगा, वंदे मातरम, भारत माता की जयच्या उद्धघोषाने लासुर स्टेशन दुमदुमले. ऑपरेशन सिंदूर च्या यशानंतर भारतीय सैन्याच्या सन्मानार्थ तसेच माय माऊलियांच्या कुंकवाच्या रक्षणार्थ ( दि.२५ ) मे रविवार रोजी सकाळी आ प्रशांत बंब तसेच सीमेवर सवरक्षण करणाऱ्या आजी माजी सैनिकांच्या प्रमुख उपस्थितीत सर्वपक्षीय तिरंगा यात्रा काढण्यात आली. दरम्यान लासुर स्टेशन येथील देवगाव रोडवरील छत्रपती संभाजी महाराज यांना अभिवादन व पुष्पहार अर्पण करून तिरंगा यात्रेस सुरवात करण्यात आली.



पुढे लोकशाहीर आण्णा भाऊसाठे, विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार व अभिवादन करून मुख्य रस्त्यावरून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकात येऊन छत्रपती शिवाजी महाराज यांना पुष्प-हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर आ बंब यांनी आलेल्या आजी माजी सैनिकांचा सत्कार करून त्यांना अभिवादन केले. देश सेवेसाठी ज्यांनी आपले बलिदान दिले शूर सैनिकांना श्रद्धांजली अर्पण करून राष्ट्रगीताने या तिरंगा यात्रेची समाप्ती करण्यात आली दरम्यान यावेळी लासुर स्टेशन परिसरातील मोठ्या संख्येने महिला तसेच नागरिक विविध पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## देशातील ५ विधानसभा मतदारसंघांच्या पोटनिवडणुका जाहीर

### निवडणूक आयोगाचा निर्णय आचारसंहिता लागू

**आत्ताच एक्सप्रेस**


**दिल्ली/प्रतिनिधी/**देशातील पाच विधानसभा मतदारसंघांमध्ये लवकरच पोटनिवडणुका होणार आहेत. निवडणूक आयोगाने त्यासाठी अधिकृत घोषणा केली आहे. गुजरात, केरळ, पंजाब आणि पश्चिम बंगाल राज्यांतील रिक्त जागांवर निवडणुका घेण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे. या राज्यांमध्ये काही जागा आमदारांच्या मृत्यूमुळे तसेच राजीनाम्यानंतर रिकाम्या झाल्या आहेत.

कोणत्या मतदारसंघात पोटनिवडणूक जाहीर?

गुजरातमध्ये कडी (अनुसूचित जाती) मतदारसंघाचे आमदार कर्सनभाई पंजाभाई सोलंकी यांचे निधन झाले तर विसावदर मतदारसंघाचे आमदार भायाणी भूपेंद्रभाई गांधीभाई यांनी राजीनामा दिला होता. केरळमधील निलांबूर येथे आमदार पी. व्ही. अनवर यांनी राजीनामा दिल्यानंतर ही जागा रिकामी झाली. पंजाबमधील लुधियाना वेस्ट मतदारसंघाचे आमदार गुरप्रीत बसी गोगी आणि पश्चिम बंगालमधील कालिगंज मतदारसंघाचे आमदार नासिरुद्दीन अहमद यांचे निधन झाल्यामुळे त्या मतदारसंघातही निवडणुका होणार आ-हेत.

निवडणूक प्रक्रिया कधीपासून सुरु?

या पोटनिवडणुकांसाठी निवडणूक प्रक्रिया २६ मे २०२५ रोजी अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतर सुरू होणार आहे. उमेदवारांना नामनिर्देशन दाखल करण्याची अंतिम तारीख २ जून असून ३ जून रोजी त्याची छाननी होईल. उमेदवारी मागे घेण्याची अंतिम मुदत ५ जून निश्चित करण्यात आली आहे. मतदान १९ जून रोजी होणार असून




मतमोजणी २३ जून रोजी पार पडेल. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया २५ जूनपर्यंत पूर्ण होणार आहे. या निवडणुकांमध्ये सर्व मतदान केंद्रांवर इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन (एतच्) आणि व्हीव्हीपॅटचा वापर करण्यात येणार आहे. मतदार ओळखीसाठी EPIC व्यतिरिक्त आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, पासपोर्ट यासारखी १२ पर्यायी ओळखपत्रे ग्राह्य धरली जाणार आहेत.

सर्व मतदारसंघांमध्ये आदर्श आचारसंहिता तत्काळ लागू करण्यात आली आहे. याशिवाय, गुन्हेग-ारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांनी ती जाहीर करणं बंधनकारक असल्याचेही आयोगाने स्पष्ट केले आहे.

## जिल्हास्तरीय हिंदी आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान पिशोर येथील जयवंतराव पाटील यांना

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड / प्रतिनिधी/** कन्नड तालुक्यातील पिशोर येथील घाटमाथा शिक्षण प्रसारक मंडळ, शफेपुर संचलित, महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील हिंदी विषयाचे प्रा. जयवंतराव श्रीराम पाटील यांना हिंदी प्रचार व प्रसार कार्या करीता महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालय हिंदी अध्यापक संघ, पुणे यांच्या वतीने छत्रपति संभाजी नगर जिल्हा स्तरीय हिंदी आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ प्रदान करण्यात आला.

उपर्युक्त पुरस्कार सोहळा त्रिमूर्ति पावन प्रतिष्ठान, त्रिमूर्ति नगर, नेवासा फाटा ता. नेवासा जिल्हा अहिल्यानगर येथे नाशिक विभाग पदवीधर मतदार संघाचे आमदार मा. सत्यजीतजी तांबे व त्रिमूर्ति प्रतिष्ठानचे संस्थापक मा. श्री साहेबरावजी घाड़गे पाटील यांच्या हस्ते दोन दिवसीय हिंदी कार्यशाळा अंतर्गत कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. या प्रसंगी महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालय हिंदी अध्यापक संघाचे अध्यक्ष आदरणीय प्रा. डॉ. मिलिंदजी कांबळे सर, सचिव प्रा. डॉ. रेवनाथजी कर्डिले, कोषाध्यक्ष प्रा. सुंदर लोढ़े तसेच छत्रपति संभाजी नगर विभागचे अध्यक्ष प्रा. डॉ. राजकुमार कांबले, सचिव प्रा. डॉ. अरुण आहेर जिल्हाध्यक्ष प्रा. गोरख सूर्यवंशी आदि मान्यवर उपस्थित होते. या हिंदी कार्यशाळे साठी राज्याच्या सर्व विभागातून जवळपास दिडशे हिंदी विषयाचे प्राध्यापक आलेले होते.

प्रा. जयवंतराव पाटील यांना पुरस्कार मिळाल्या बद्दल घाटमाथा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष क. रा. नवले गुरूजी, सचिव गोकुळ



दादा मोकासे, काकासाहेब मोकासे, बाळास-ाहेब मोकासे, भुषण नवले सुनील मोकासे, प्राचार्य एन. आर. नवले, उपप्राचार्य श्रीमती अर्चना नवले, पर्यवेक्षक के. एम. हळदे , कॉलेज विभाग प्रमुख प्रा. विजय वाघ, प्रा. डॉ. संजय गायकवाड, प्रा. राजेश भावसार प्रशांत कोतकर, संतोष जाधव विजय सोनवने सत्येंद्र सपकाळे डॉ. गीताराम पवार शहादेव गावडे, प्रा. अमोल निकम व माध्यमिक विद्यालयाचे संपूर्ण शिक्षक वृंद तसेच लक्ष्मण मोकासे, समाधान मोकासे, यासीन शाह आदि शिक्षकेतर कर्मचारीवर्गाने प्रा.जयवंतराव पाटील यांचे कौतुक व अभिनंदन केले.

## ७/१२ उतारा बनावट तयार केल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्तता

**आत्ताच एक्सप्रेस**

**परतुर /प्रतिनिधी/** परतुर येथील सर्वे नंबर १४५ च्या सातबारा उतारा बनावट तयार केलाच्या आरोपातून निर्दोष मुक्ततता करण्यात आली असून या विषय सविस्तर वृत असे की, फिर्यादी दिलीप माणकचंद नहार यांनी दिलेल्या १५६ (३) अर्जावरुन सन २०१७ मध्ये रावसाहेब भापकर व खिराजी भापकर यांचेवर सेतू चालक गजानन माने यांच्या मदतीने ७/१२ खोटा बनवून क्षेत्रफळात फेरफार केला असा आरोप करुन गुन्हा दाखल करण्यात आला. संपूर्ण खटल्याची संपरीक्षा झाल्याने रावसाहेब खिराजी भापकर यांची निर्दोष मुक्तता केली, तर खिराजी भापकर हे मयत झाल्याने त्यांच्या विरुध्द खटला रद्द करण्यात आला अभीयोग पक्षाकडून एकूण ०६ साक्षीदार तपासण्यात आले त्यात तत्कालीन तलाठी मुकुंद कुलकर्णी व तहसिलदार विन-ोद गुडमवार यांना तपासण्यात आले परंतु गुन्हा सिध्द न झाल्याने प्रकरणात दिनांक २३/०५/२०२५ रोजी मुक्त करण्यात आले बचाव पक्षाकडून ॲड. नितीन मधूकर मस्के यांनी बाजू मांडली.

निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस



# संक्षिप्त

## दहशतवाद वैश्विक समस्या

भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची २१ मे १९९१ मध्ये तामिळनाडू मधील श्रीपेराम्बदूर येथे एल टी टी ई ( लिट्टे ) च्या दहशतवाद्यांनी एका प्रचारसभेत बॉम्बस्फोट करून हत्या केली. राजीव गांधी यांच्या हत्येने संपूर्ण देश हादरुन गेला. १९८४ साली माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची खलिस्तानवादी दहशतवाद्यांनी गोळ्या घालून हत्या केली त्यानंतर भारताला बसलेला हा दुसरा हादरा होता. हा हल्ला भारताच्या सार्वभौमत्वावर होता. या हल्ल्याने भारतच नव्हे तर संपूर्ण विश्वच दहशतवाद्यांच्या दहशतीखाली आले. २१ मे १९९१ पासून सुरू झालेला दहशतवाद्यांचा हा धुमाकूळ आजही जगभरात सुरू आहे म्हणूनच २१ मे हा राजीव गांधी यांचा स्मृतिदिन संपूर्ण जगात दहशतवादी विरोधी दिन म्हणून पाळण्यात येतो. सद्य स्थितीत जगभरात वेगवेगळ्या प्रकारचा दहशतवाद पसरला आहे. दहशतवादाने संपूर्ण जग व्यापले आहे. जगातील एकही देश आज दहशतवादापासून मुक्त नाही. दहशतवाद आज सर्व देशांचे दार ठोठावीत आहे. अमेरिकेसारख्या जागतिक महासत्तेला देखील दहशतवादाचा तडाखा बसला आहे. दहशतवादी हा शब्द उच्चारायला जरी वेगळा वाटत असला तरी याचे नेतृत्व करणारे लोक हे अशिक्षित नसून उच्चशिक्षित असतात. देव व धर्माच्या नावाखाली तरुणांचे ब्रेन वाशिंग करुन हे लोक श्रध्येच्या नावाखाली जगभरात दहशतवाद पसरवीत आहेत. दहशतवाद म्हणजे लोकशाहीच्या विरोधातील बाजू त्यामुळे दहशतवाद हा लोकशाही शासनव्यसवस्थेत अडथळे निर्माण करतो. सामाजिक असंतुलन हे दहशतवादाचे मूळ आहे. सत्तेची हाव, अधिकार नाकारणे, स्वतःच्या फायद्यासाठी दुसऱ्याला ओलीस धरणे, धर्मसत्ता लादणे, जाती भिन्नता, धर्मभेद तसेच समाजातील भिन्न संस्कृतीचे लोक एकमेकांबरोबर आणि एकाच राजकीय छत्राखाली व एकाच न्यायव्यवस्थेखाली राहायला नाखूष असतात. बरेचदा राज्यकर्त्यांचे एखाद्या भागाकडे दुर्लक्ष होते व त्या भागाची प्रगती खुंटते त्यामुळे एकाच देशात आर्थिक भेदभाव निर्माण हातात आणि त्यातून आतंकवादाचा जन्म होतो. आपण सर्वांनी जागरूक होणे आवश्यक आहे. दहशतवाद हा मानवजातीचा शत्रू आहे. यामुळे संभाव्य धोक्याची जाणीव ठेवून प्रतिकारासाठी सज्ज असले पाहिजे. जागतिक दहशतवादाचा सगळ्यात मोठा हादरा भारताला बसला आहे, त्यामुळे दहशतवाद नष्ट करणे ही देशातील प्रत्येक नागरिकांची जबाबदारी आहे. दहशतवादाची सर्वाधिक झळ भारताला बसली आहे. दहशतवादाने भारताला दोन कर्तव्यदक्ष पंतप्रधानांना गमवावे लागले आहे. अगदी सर्वसामान्य नागरिकांपासून पंतप्रधानांपर्यंत सर्वांनाच दहशतवाद्यांनी लक्ष केले आहे. गेल्या पन्नास वर्षापासून भारत दहशतवादाचा झळा सोसतोय त्यात देशातील लाखो निष्पाप नागरिकांचा बळी गेला आहे आजही जात आहे. २२ एप्रिल रोजी काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी २६ निष्पाप नागरिकांना ठार केले त्यामुळे भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात संतापाची लाट उसळली. भारताने ऑपरेशन सिन्दुर राबवून त्याचा बदला घेतला मात्र तरीही दहशतवादी त्यातून धडा घेतील असे वाटत नाही. ते दहशतवाद पसरवतच राहतील. दहशतवाद संपवण्याची जबाबदारी केवळ सरकारची, सुरक्षा यंत्रणेची किंवा लष्कराची नाही तर देशातील प्रत्येक नागरिकांची आहे. देशातील नागरिकांनीही नेहमी सजग राहून दहशतवादाचा मुकाबला करायला हवा. आपल्या आसपास कोठेही काही संशयास्पद आढळले तर नागरिकांची त्यांची माहिती सुरक्षा यंत्रणांना द्यावी. सुरक्षा यंत्रणेइतकेच नागरिकांनीही सजग राहून दहशतवादाचा मुकाबला करायला हवा. दहशतवादाची झळ जशी भारताला बसली आहे तशीच ती जगालाही बसली आहे. दहशतवादाने केवळ भारतच नव्हे तर संपूर्ण जग पोळले आहे. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, स्पेन, जर्मनी, जपान, दक्षिण कोरिया, रशिया, इस्राईल, ऑस्ट्रेलिया, श्रीलंका या जगातील बलाढ्य देशांनाही दहशतवाद्यांनी तडाखा दिला आहे. केवळ बलाढ्य देशच नव्हे तर जगातील सर्वच लहान मोठ्या देशांना दहशतवादाची झळ बसत आहे म्हणूनच दहशतवादाचा मुकाबला करणे ही कोणा एका देशाची नाही तर जगातील सर्व देशांची जबाबदारी आहे. दहशतवादाची समस्या ही वैश्विक आहे म्हणून दहशतवादाशी लढायचे असेल तर संपूर्ण जगाला एक व्हावेच लागेल त्यासाठी अमेरिका, रशिया सारख्या महासत्ता असलेल्या देशांनी दुटप्पी भूमिका न घेता दहशतवादा विरुद्ध युद्ध पुकारावे. दहशतवादी हे मानवतेचे शत्रू आहे. त्यामुळे संपूर्ण जगानेच एक होऊन या मानवतेच्या शत्रूंचा मुकाबला करायला हवा.

– श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

# अहिल्यादेवी होळकर जयंती निमित्त आयोजित मोफत आरोग्य शिबिरास उत्कृष्ट प्रतिसाद

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/** पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांच्या श्री शताब्दी जन्म महोत्सवी वर्षानिमित्त मुकुंदवाडी येथील अहिल्यादेवी होळकर स्मारक सभागृहामध्ये आयोजित केलेल्या भव्य मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे उद्धाटन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. शिवाजी पोले व ज्येष्ठ समाजसेवक काशिनाथ भुतळे यांच्या शुभहस्ते आणि राज्याचे माजी पणन संचालक डॉ सुभाषराव माने यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले.या कार्यक्रमास शिवाजी बँकेचे अध्यक्ष श्री रवींद्र काळे, मनपाचे काँग्रेसचे गटनेते भाऊसाहेब जगताप, सुभाष बोंद्रे,जय मल्हार सेनेचे प्रमुख लहुजी शेवाळे, जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष डॉ. पवन डोंगरे, कार्याध्यक्ष पुरुषोत्तम पानपट, तेजराव निकम, कोषाध्यक्ष रामराव शेळके, यादवराव गवारे ,भानुदास कोरे, बंडुराव लोणे, दिपालीताई मिसाळ, यांच्यासह २१ वेगवेगळ्या विभागाचे डॉक्टर्स उपस्थित होते. अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून व फीत कापून शिबिराचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी या देशामध्ये अत्यंत आदर्श राज्य कारभार केलेला असून सध्याच्या राज्यकर्त्यांनी त्यांच्या कार्याचा वसा घेतला पाहिजे असे प्रतिपादन यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानावरून बोलताना डॉ. सुभाष माने यांनी केले. याप्रसंगी उपस्थित अनेक मान्यवरांनी आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयंती उत्सव समितीचे सहकार्य अध्यक्ष सुग्रीव मुंडे यांनी केले तर आभार प्रदर्शन नवीन ओबेराय यांनी केले.

आरोग्य शिबिरात सर्वश्री डॉ .अजय दंडे, डॉ. चंद्रशेखर कंदरफळे, डॉ. चंद्रशेखर गायके, डॉ. गणेश डोईफोडे, डॉ. संभाजी चिंतले. डॉ. परमेश्वर कहाळेकर, डॉ .अशोक गलांडे, डॉ. महेंद्र खंदारे, डॉ. विवेक कोकणे, डॉ. श्रद्धा गायके, डॉ .सुमंत सावजी, डॉ. विजय मेहत्रे, डॉ .कार्तिक रमण, डॉ .तेजस्वी सावजी, डॉ . गोविंद टिळे यांनी आलेल्या सर्व रुग्णांवरती योग्य ते तपासणी व उपचार केले. सकाळी ११ ते २ या दरम्यान जवळपास ५२३ रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दीपक महानवर, लक्ष्मण कोरडे, लक्ष्मण खरात, जगन्नाथ सोनाळकर, मनोहर सुरे, भगीरथू सुरे, महात्मा ठाकूर यांनी परिश्रम घेतले.

# विवाह कशासाठी? सुखासाठी की दुःखासाठी?

विवाह कशासाठी ? असा प्रश्न सर्वांना पडतच असेल. तसा पडल्याशिवाय राहात नाही. लोकं त्या विवाहाचा संबंध फक्त अश्लील गोष्टीशी जोडतात. अन् ती गोष्टही खरी आहे. कारण विधात्यानं ती गोष्ट विवाह रुपानं का होईना, विवाहात समाविष्ट केल्यानं विवाह टिकतो. काही लोकांचा टिकत नाही. कारण त्यांचे विवाहबाह्य विवाहापुर्वीच संबंध असतात किंवा विवाहानंतर निर्माण होत असतात. परंतु ती कारणं लपवून काही लोकं भलतीच कारणं पुढं करीत असतात व घटस्फोट घेत असतात.

विवाह हे अश्लील बाबी करण्यासाठी नसतात. असे म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. कारण विवाहानंतर खरं सुख व्यक्तीच्या जीवनात निर्माण होत असते. तसं पाहिल्यास सर्वात महत्वाचं असतं जगणं. जगण्यासाठी आपल्या वयाच्या प्रौढावस्थेपर्यंत आपले आईबाप सोबतीला असतात. ते आपल्या विवाहाची प्रौढावस्था झाली की वयोवृद्ध झालेले असतात. काही लोकांचे आईवडील हे मृतावस्थेत आलेले असतात. काहींचे मरण पावलेले असतात. अशावेळेस आपल्या जगण्यात नवचैतन्य निर्माण व्हावं व आपल्याला जगता यावं म्हणून विवाह हे एकच माध्यम असतं.

विवाह हे असं माध्यम आहे की त्या माध्यमातून बहुतेकांना आपले आईवडील प्राप्त होत असतात. कारण विवाह झाल्यानंतर जी पत्नी घरी येत असते. ती पत्नी आपल्या आईवडीलांपेक्षाही मुलांना प्रिय वाटत असते. तसेच स्रियांनाही त्यांचे पती आपल्या आईवडीलांपेक्षा प्रिय वाटत असतात. मात्र आपला समाज पुरुषसत्ताक कुटूंब पद्धतीवर आधारित असल्याने घरातील पुरुष असलेला पती हा बाहेर कामाला जात असल्याने पत्नी नावाचा घटक घरी राहात असतो. तो घटक कंटाळतो. म्हणूनच तिला जीवन व वातावरण कंटाळवाणं वाटू नये म्हणून ते दोघंही एक दोन लेकरं जन्मास घालतात. हे लेकरं खेळणिसारखेच असतात की जे मनोरंजन करीत असतात. ज्यातून त्यांच्यासोबत वावरतांना आयुष्याचे दिवसं कठीण वाटत नाहीत. त्यांच्या जीवनात सुखशांती प्राप्त होत असते.

म्हणतात की विधात्यानं सृष्टीची रचना केली व त्या जीवनात, ते जीवन कंटाळवाणे वाटू नये म्हणून मनोरंजनाची साधणं निर्माण केली. तसं आयुष्य हे दुःखदायकच बनवले आहे. असे दुःखदायक असलेले जीवन कंटाळवाणे वाटू नये म्हणून हे मनोरंजनाचे साधन. साधारणतः टिव्ही, रेडिओ माणसं किती पाहणार? त्यापेक्षा लेकरं बरे. असा विचार करुन आयुष्यभर सोबत राहणारी लेकरं जन्मास घालणं व टुढं त्यांच्यासोबत वावरुन संकटात त्यांना मदत करणं हे आईवडीलांचं कर्तव्य. हे सर्व करीत असतांना आयुष्य कितीही कठीण प्रसंग आले तरी चांगलंच कटतं. त्यात चिंतेची बाब राहात नाही वा चिंता लक्षात येय नाही. विवाहानंतर जेव्हा आपल्या आईवडीलांची जागा घेवून जोडीदार आपल्या जीवनात प्रवेशला आणि तो जर समजदार असला तर काही पाहावेच लागत नाही. मग आयुष्य अती सुंदरच होते. तसं पाहता म्हणतात की पती हा जर संसाराच्या बैलगाडीचं एक चाक असेल तर पत्नी ही दुसरं चाक असतेच. त्याशिवाय बैलगाडी बरोबर चालतच नाही. परंतु ज्याप्रमाणे बैलगाडीचं एक चाक बिघडलं की बैलगाडी एका जागेवर उभी होते. तसंच संसाराचंही आहे. चांगला संसार चाललेल्या संसारात कोणीतरी दलाल येतो ववतो दलाल त्या चांगल्या संसारात आगीचे डोंब टाकून त्यांचा चांगला संसार तोडत असतो. कारण कोणाचाही सुखाचा संसार कुणाला चांगला बघवत नाही.

# ऑनलाईन वीजबिल भरणाऱ्या ३२० वीजग्राहकांना मिळाले स्मार्टफोन अन् स्मार्टवॉच

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी/** राज्यातील ७० टक्क्यांपेक्षा जास्त वीजग्राहक दरमहा ऑनलाईन वीजबिल भरतात. ऑनलाईनचा हा टक्का वाढविण्याच्या हेतूने महावितरणने 'लकी डिजीटल ग्राहक योजना' जाहीर केली होती. ७ मे रोजी या योजनेचा दुसरा ड्रॉ काढण्यात आला. यात छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील १६० ग्राहकांना स्मार्टफोन व स्मार्टवॉच अशी बक्षिसे मिळाली असून, प्रत्येक उपविभाग पातळीवर विजेत्या ग्राहकांना बक्षिसांचे वाटप करण्यात आले आहे. ७ एप्रिल रोजी काढलेल्या पहिल्या ड्रॉमधील १६० ग्राहकांनाही एप्रिलमध्ये बक्षिसे देण्यात आलेली आहेत. परिमंडलात आतापर्यंतच्या दोन ड्रॉमध्ये ३२० ग्राहकांना बक्षिसे देण्यात आली आहेत. तिसरा ड्रॉ जून महिन्यात रोजी काढण्यात येणार आहे.छत्रपती संभाजीनगर परिमंडलात ३२ उपविभाग आहेत. यामध्ये छत्रपती संभाजीनगर शहर मंडलात ८, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण मंडलात १५ व जालना मंडलात ९ उपविभाग आहेत. प्रत्येक उपविभागातून पहिल्या क्रमांकाचे १, दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकासाठी प्रत्येकी दोन विजेत्यांची निवड झाली. ज्यातून पहिल्या क्रमांकासाठी ३२ स्मार्टफोन, दुसऱ्या क्रमांकासाठी ६४ स्मार्टफोन आणि तिसऱ्या क्रमांकासाठी ६४ स्मार्टवॉच अशी एकूण १६० बक्षिसे प्रत्येक ड्रॉमध्ये ग्राहकांना मिळाली आहेत. प्रत्येक उपविभाग पातळीवर विजेत्या ग्राहकांना सन्मानित करुन बक्षिसांचे वाटप करण्यात आले आहे.या योजनेतील विजेते कर्तारसिंग धिल्लन, खंडू कोंडीबा, शंकर भेसार, दिलीप कुलकर्णी, सुनील लिंभारे या ५ ग्राहकांना प्रातिनिधीक स्वरूपात छत्रपती संभाजीनगर ग्रामीण विभाग -१ कार्यालयात २१ मे रोजी बक्षिसे वितरित करण्यात आली. उपकार्यकारी अभियंता प्रमोद राख, उपव्यवस्थापक (वित्त व लेखा) अजय म्याना, बंडू राठोड, सहायक अभियंता मोहंमद सिद्दिकी, कनिष्ठ अभियंता प्रशांत बनसोडे, सहायक लेखापाल सुनील तगरे, उच्चस्तर लिपिक अपर्णा जोशी यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.



१ जानेवारी २०२५ ते ३१ मे २०२५ या कालावधीत ही योजना सुरू असून, सलग तीन किंवा त्यापेक्षा अधिक वीजबिल भरणाऱ्या ग्राहकांना 'लकी डिजीटल योजनेचा' लाभ मिळणार आहे. विजेत्यांची नावे संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन जाहीर करण्यात आली.या योजनेच्या कालावधीत ग्राहकाने नेट बँकिंग, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, यूपीआय, वॉलेट, कॅश कार्ड, एनएसीएच, क्यूआर कोड, एनईएफटी, आरटीजीएस इ. ऑनलाईन वीज बिल भरणा पर्याय वापरून लकी ड्रॉ महिन्याच्या अगोदर दरमहा एकप्रमाणे सलग तीन किंवा तीनपेक्षा जास्त महिने वीजबिल भरणे आवश्यक राहील.ग्राहकांनी रांगेत उभे राहण्यापेक्षा वेळ, श्रम व पैशांची बचत करीत डिजिटल पद्धतीने वीजबिल भरणा करावा, यासाठी महावितरणने ु.ारहरवळीलो.ळप हे संकेतस्थळ व महावितरण मोबाईल पची सुविधा ग्राहकांना २४ तास उपलब्ध करून दिलेली आहे. तसेच देय रकमेवर ०.२५ टक्के डिजिटल वीजबिल भरणा सूटसुद्धा दिली जात आहे.

**- पवनकुमार कछोट,**
**मुख्य अभियंता, महावितरण,**
**छत्रपती संभाजीनगर परिमंडल**

# पाडळी शिवारात शेती रस्ता करण्याची ग्रामस्थांची मागणी

### गावकऱ्यांच्या वतीने तहसिलदार यांना निवेदन

**आत्ताच एक्सप्रेस**
**परतूर /प्रतिनिधी / तालुक्यातील** पारधी पाडळी येथील शिवारात शेतकऱ्यांना शेतात रस्ता करून देण्याची मागणी येतील ग्रामस्थांनी तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे .यावेळी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की मौजे पाडळी पारधी या गावचे पुनर्वसन परतूर वाटूर रोडवर नागापूर पाटीजवळ झालेले आहे. सदरील पुनर्वसन ते जुने पाडळी गाव हें सहा किमी अंतरावर बसलेले आहे. पुनर्वसन येथील शेतकऱ्यांच्या जमिनी या जुन्या गावाजवळ आहेत. जवळपास ५०० ते ६०० एकर जमीन या रस्त्यावर वहिती करणे अवलंबून आहे. गावात जाणारा सहा किमी प्रयन्त शेतरस्ता पूर्ण खराब झाला आहे, त्या पैकी दोन किमी रस्ता झाला आहे. उर्वरित चार किमी रस्ता पूर्णपणे खराब झाला असून मोठमोठे खड्डे पडले आहेत. यामुळे पुनर्वसन येथिल शेतकऱ्यांना आपली शेती वहिती करण्यासाठी रस्ता नसल्याने शेतमाल वाहतून करणे व वाहतूकसाठी अडचणीत येत आहे. पावसाळ्यात रस्ता चिखलमय होत असल्यामुळे शेतकऱ्याचे हाल होत असल्याने पाडळी गावाच्या शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी चार किमी रस्ता त्वरित करुन द्यावा अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. या निवेदनावर सरपंच प्रसाद काकडे , उपसरपंच शामराव काळे, ग्रामपंचायत सदस्य सचिन मस्के, भास्कर बोराडे, संदीप मस्के, कुंडलिक मस्के,बाळासाहेब मस्के, रमेश काकडे, वैभव बोराडे, यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. या निवेदनाच्या प्रतिलिपी आमदार बबनराव लोणीकर, जिल्हाधीकरी, उपविभागीय अधिकारी परतूर यांना दिल्या आहेत.



# करिअर कट्टा आणि महाविद्यालयांमध्ये सामंजस्य करार

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी/** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या 'करिअर कट्टा आणि छत्रपती संभाजीनगर विभागातील ३९ हून अधिक महाविद्यालयांमध्ये सामंजस्य करार करण्यात आले. छत्रपती संभाजीनगर येथील देवगिरी महाविद्यालय (स्वायत्त) येथे बुधवार दिनांक २१ मे २०२५ रोजी या महत्त्वपूर्ण करारासाठी छत्रपती संभाजीनगर विभागीय स्तरावरील बैठक आयोजित करण्यात आली होती.

देवगिरी महाविद्यालय, (स्वायत्त) छत्रपती संभाजीनगरचे प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर, छत्रपती संभाजीनगर विभाग स्तरावरील या बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे, प्राचार्य डॉ. भारत खंदारे विभागीय प्राचार्य प्रवर्तक, प्राचार्य चंद्रसेन कोठावळे, प्राचार्य प्रवर्तक, छत्रपती संभाजीनगर, डॉ. हरिदास फेरे, प्राचार्य प्रवर्तक हिंगोली, डॉ.राजेश लहाने, विभागीय समन्वयक, छत्रपती संभाजीनगर, डॉ लक्ष्मीनारायण कुरपटवार सहविभागीय समन्वयक छत्रपती संभाजीनगर, डॉ. वैशाली पेरके, जिल्हा समन्वयक, छत्रपती संभाजीनगर (शहर), डॉ. दत्तात्रय नरसाळे, जिल्हा समन्वयक, बीड (ग्रामीण पश्चिम )यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रत्यायन परिषदेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार महाविद्यालयांना आवश्यक असलेला हा सामंजस्य करार करिअर कट्ट्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन आणि कौशल्य विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे. या बैठकीमध्ये छत्रपती संभाजीनगर विभागातील एकूण ३९ महाविद्यालयांनी सक्रिय सहभाग नोंदवला आणि सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या.




### ३९ पेक्षा जास्त महाविद्यालयांचा समावेश

यात प्रामुख्याने देवगिरी महाविद्यालय, (स्वायत्त) छत्रपती संभाजीनगर,पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय सिल्लोड, राजीव गांधी महाविद्यालय करमाड, एकनाथ शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला महाविद्यालय बिडकीन, यश इन्स्टिट्यूट ऑफ फार्मासिटी सिडको महानगर, छत्रपती संभाजीनगर, संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव, शिवछत्रपती महाविद्यालय पाचोड, आनंदराव धोंडे महाविद्यालय कडा आष्टी, लालबहादूर शास्त्री महाविद्यालय परतूर यांसारख्या प्रमुख महाविद्यालयांचा समावेश होता.

या सामंजस्य करारामुळे महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना करिअरच्या विविध संधी, मार्गदर्शन आणि प्रशिक्षण उपलब्ध होणार असून, त्यांच्या शैक्षणिक विकासाला चालना मिळणार आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थी आणि उद्योग यांच्यातील समन्वय वाढण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813